दैनिक
अधिकारनामा
विदर्भातील सर्वाधिक पसंतीचे विश्वासार्ह दैनिक
August 8, 2025
Page no:4 | epaper.adhikarnama.in

# श्री. शिवाजी विद्यालय येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा संपन्न

दै. अधिकारनामा / रितेश टिलावत



**अकोला :** श्री शिवाजी विद्यालय, मुख्य शाखा, अकोला येथे दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यां साठी सायबर सुरक्षा विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्या त आले. या कार्यशाळेचे आयो जन शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. विजय ठोकळ सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे उपमुख्याध्या पक श्री. हिम्मतराव गवई सर होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. अमर देशमुख सर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून श्री. यश भालेराव आणि श्री. सुमित सपकाळ, हे शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील बीसीए अंतिम वर्षाचे विद्यार्थी, उपस्थित होते.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व, इंटरनेटचा सुरक्षित वापर, सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे उपाय, तसेच वैयक्तिक माहितीचे संरक्षण कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणां द्वारे सायबर जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन विद्या वसु मॅडम यांनी केले. या कार्यशाळेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक माहिती आत्मसात करत जागरूकतेचा संदेश घेतला.